# अकोला जिल्हा पोलीस दलातील बेवारस वाहनांचा जाहिर लिलाव.

पोलीस अधीक्षक कार्यालय,अकोला यांचे अधिनस्त पोलीस स्टेशन मधिल बेवारस वाहनांचा (भंगार)एकत्रीत लिलाव करावयाचा आहे.

**वाहनांचा सविस्तर तपशिल.**

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | वाहनांची संख्या | वाहने ठेवण्यात आल्याचे ठिकाण | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | दुचाकी मो.सा. | 59 | शहर वाहतुक शाखा, अकोला | शहर वाहतुक शाखा, अकोला |
| २ | चार चाकी | 02 | | |
| एकुण | | 61 | | |

सदर वाहने सद्यास्थितीत ज्या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहेत त्या ठिकाणी लिलावाच्या २ दिवसापुर्वी पाहावयास मिळतील. तरी लिलावात भाग घेऊ ईच्छिणाऱ्यांनी निश्चित ठिकाणी उपस्थित राहावे.

## लिलावाचा तपशिल

१) लिलाव करणाऱ्या कार्यालयाचे नांव :- पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला.

२) लिलावाची तारीख व वेळ :- 03 / 04 / 2025 वेळ सकाळी 10.00 वा.

लिलावाच्या सविस्तर अटी व शर्ती सविस्तरपणे शहर वातुक शाखा, अकोला यांचे सुचना फलकावर पहावयास मिळतील त्याच प्रमाणे लिलावाचे तारखेला लिलाव सुरू होण्यापुर्वी लिलावाच्या अटी व शर्ती वाचुन दाखविण्यात येतील. काही अपरीहार्य कारणामुळे नियोजीत तारखेचे दिवशी लिलावाचे काम पुर्ण झाले नाहीतर दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी सकाळी 10.00 वा लिलावाचे कामकाज सुरू करण्यात येईल.

## जाहिरात लिलावाच्या अटी व शर्ती

- लिलावात बोली बोलण्यापुर्वी 78,000/रू अक्षरी (अठयाहत्तर हजार रुपये) एवढी रक्कम पोलीस अधीक्षक कार्यालय,अकोला येथे संपर्क करून D.D. व्दारे PA TO SP AKOLA या नावे जमा करून जमा केलेली पावती दिनांक 01 / 04 / 2025 चे 16.00 पावेतो पोलीस अधीक्षक कार्यालयास जमा करावी लागेल. त्याशिवाय बोलीमध्ये भाग घेता येणार नाही.
- जाहिरातीचा होणारा खर्च ज्यांची बोली अंतीम करण्यात येईल त्यांना भरावा लागेल.
- यशस्वी बोलीदाराने वाहने खरेदीच्या एकुण रकमेवर नियमानुसार 18 % GST टॅक्स भरूण टॅक्स भरल्याची पावती पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला येथे जमा केल्यानंतर वाहने (भंगार) ताब्यात देण्यात येतील.

- लिलावाचे अटी व शर्तीनुसार वाहने यशस्वी बोलीदारास ताब्यात देणे आधी स्क्रॅप (भंगार) करणे असल्याने वाहने स्क्रॅप करणेकरीता येणारा खर्च हा यशस्वी बोलीदारास भरणे बंधनकारक असेल.
- लिलाव करावयाचे बेवारस वाहने (भंगार)ज्या स्थितीत आहेत त्या स्थितीत स्विकारावे लागतील.
- लिलाव करण्यात येणारी वाहने स्क्रॅप मटेरीयल ( भंगार ) म्हणुन विकण्यात येणार असुन, सदरील बेवारस वाहने रोडवर वापरण्यात येणार नाहीत याबाबत यशस्वी बोलीदाराने शपथपत्र सादर करावे व भविष्यात तसे आढळल्यास संबधीत व्यक्ती विरोधात कायदेशीर कारवाई करण्यास पात्र ठरतील.
- ईच्छुक बोलीदाराला निश्चित केलेल्या किंमतीच्या पुढे बोली बोलावी लागेल. त्यापेक्षा कमी बोली बोलता येणार नाही. त्याच प्रमाणे बोलीस वाढवायची असल्यास ५०००/-(पाच हजार रूपये) च्या पटीत वाढविणे बंधनकारक असेल.
- ईच्छुक बोलीदारांना लिलावात असलेली बेवारस वाहने लिलावापुर्वी **दोन दिवस** आधीपासुन शहर वाहतुक शाखा, अकोला येथे पाहता येतील बोलीदारांनी वाहनांची तपासणी केली असे गृहीत धरून नंतर त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार एकली जाणार नाही किंवा स्विकारली जाणार नाही.
- सर्वाधिक बोली बोलणाऱ्या बोलीदाराला बोलीच्या दिवशी 50 % रक्कम लिलाव अधिकाऱ्याकडे D.D. व्दारे PA TO SP AKOLA या नावे त्वरीत भरावी लागेल. बोलीची उर्वरीत रक्कम पुर्ण भरेपर्यंत लिलावाच्या साहित्याची जबाबदारी बोलीदाराची राहील. त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.सदर रक्कम मुदतीत न भरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदरची बोली रद्ध करण्यात येईल.
- ज्यांची सर्वाधीक बोली असेल त्यांनी जर वाहने स्विकारण्यास नकार दिला तर अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्या लगतची बोली बोलणाऱ्यास वाहने देण्याबाबतचे अधिकार पोलीस अधिक्षक कार्यालय, अकोला यांना राहतील.
- बोलीदाराने पुर्ण रकमेचा भरणा केल्यानंतर व वाहने **दोन दिवसाचे** आत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात न घेतल्यास पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला यांना लिलाव रद्ध करण्याचा अधिकार राहील व संबंधिताची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

- बोलीदाराची बोली कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणे, लिलाव कायम करणे किंवा कोणतेही कारण न देता वेळेवर रद्ध करण्याचे संपुर्ण अधिकार पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला यांनी स्वत: जवळ राखुन ठेवले आहेत.
- लिलावात  खरेदी करण्यात आलेली वाहने नेण्याची संपुर्ण जबाबदारी संबधितांची राहील त्याकरीता आमचे विभागाकडुन मुनष्यबळ अथवा वानहखर्च देण्यात येणार नाही.
- लिलावात खरेदी केलेली वाहने हि भंगारात विक्री केल्याबाबतचे प्रमाणपत्र खरेदीदाराने या कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.
- बेवारस वाहनांच्या लिलाव बाबत वृत्त पत्रात देण्यात आलेल्या प्रसिध्दी देण्यात आल्या नंतर नागरीकांकडून जर वाहन चोरी गेले किंवा गहाळ झाल्याची तक्रार प्राप्त झाल्यास सदरचे वाहन लिलावातुन कमी करण्यात येवून संबंधीतास रितसर देण्यात येईल व उर्वरीत वाहनांच लिलाव त्यांचे किंमती नुसार लिलाव घेण्यात येईल याची बोलीदारांनी नोंद घ्यावी.

(सतिश कुलकर्णी)
उपविभागीय पोलीस अधिकारी,
शहर विभाग, अकोला तथा
समन्वय अधिकारी वाहन निर्गती जि.अकोला